I.O - PI बगाटे

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

पोलीस ठाणे शिवाजीनगर बीड ता.जि.बीड

1. **District (जिल्हा):** बीड **P.S.(ठाणे):** शिवाजीनगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0127 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**06/03/2025 05:15

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Date From (दिनांक पासून):** 05/03/2025

**Time Period (कालावधी):** पहर 6

**Date To ( दिनांक पर्यंत):** 05/03/2025

**Time From (वेळेपासून):** 16:06 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:06 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 06/03/2025 **Time (वेळ):** 04:10 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 007

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/03/2025 04:10 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** Oral

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** बीड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अमरनाथ बाजीराव अंदुरे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1992

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पारनेर हमु कालिंकामंदीरा जवळ,पाटोदा ता पाटोदा जि बीड, बीड, शिवाजीनगर,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पारनेर हमु कालिंकामंदीरा जवळ,पाटोदा ता पाटोदा जि बीड, बीड, शिवाजीनगर,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9545641991

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अर्जुन आश्रुबा राख | | | 1. थेरला तापाटोदा जि बीड,बीड, शिवाजीनगर,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | रोहित बाबासाहेब गिरी | | | 1. माळापुरी ताजि बीड, बीड, शिवाजीनगर,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 3 | रफिक इस्माईल शेख | | | 1. इस्माईलबाग अंबाजोगाई रोड, केज ताकेज जि बीड,केज, शिवाजीनगर,बीड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच रक्कम 11000/रुपये व 03 मेमरी | 11,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद
ला.प्र.वि.कार्यालय, बीड
दिनांक-05/03/2025.
मी अमरनाथ बाजीराव अंदुरे, वय-33 वर्षे, व्यवसाय- कृषी व्यापार, नेचर अॅग्रोटेक, पारनेर रा.पारनेर ह.मु. कालिंकामंदीरा जवळ, पाटोदा ता. पाटोदा जि.बीड मो.नं.9545641991 आधार क्रमांक-984083246404. मी दि.03/03/2025 रोजी ला.प्र.वि.कार्यालय, बीड येथे हजर येवुन श्री.किरण बगाटे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. बीड यांचेसमक्ष तक्रार दिली की, "माझी आई नामे श्रीमती संगिता बाजीराव अंदुरे, रा.पाटोदा ता.पाटोदा जि.बीड यांचे नावे मौजे पाटोदा ता.पाटोदा जि.बीड येथे सर्वे नं.720/अ मधील नगर परिषद मिळकत क्रमांक 4336/1 वर बांधकाम पुर्ण झालले असनु त्यापैकी इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील चार खोल्या दोन संडास बांथरुमसह वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय पाटोदा यांना दिनांक 01/04/2024 पासुन भाडेतत्त्वार देण्यात आलेले आहे. सदर जागेचे भाडे निश्चित करुन भाडे मुल्यांकन प्रमाणपत्र मिळणे करीता वन परिक्षेत्र अधिकारी पाटोदा जि.बीड यांनी मा. अभियंता सा.बां.वि.बीड यांना दि.16/03/2024 रोजी अर्ज केला. सदर भाडे मुल्यांकान प्रमाणपत्रामध्ये क्षेत्रफळ दुरुस्ती करण्यासाठी पुन्हा वनपरिक्षेत्र अधिकारी, पाटोदा यांनी दिनांक 15/08/2024 रोजी मा.अभियंता सा.बां. वि.बीड ऑनलाईन पद्धतीन अर्ज सादर केला. सादर केलेल्या अर्जामध्ये भाडे मुल्यांकन प्रमाणपत्र न मिळाल्याने मी दिनांक 01/03/2025 रोजी शाखा अभियंता, श्री.राख यांची भेट घेवुन माझे कामा बद्दल विचारणा केली असता, त्यांनी मला माझ्या कामासाठी 5,000/- रुपयाची मागणी करुन दिनांक 03/03/2025 रोजी राहते घरी बोलविले."वगैरे मजकुराची तक्रार दिली.

माझे तक्रारीचे अनुषंगाने पोनि/बगाटे यांनी दि.03/03/2025 रोजी शाखा अभिंयता श्री.राख हे माझे कामासंदर्भाने माझ्याकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे ? या बाबत मला व पंच क्र.-1 श्री.सानप यांना शाखा अभियंता श्री.राख यांचे कालीका नगर, बीड येथे पाठवुन समक्ष लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगीतले. पोनि/बगाटे यांनी मला व पंचांना व्हॉईस रेकॉर्डर बाबत माहिती देऊन प्रात्यक्षीक करुन दाखवले. त्यानंतर पोनि/बगाटे यांनी मला व पंचांना लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना दिल्या. पोनि/बगाटे यांचे सुचनेवरुन पोलीस अंमलदार श्री.खरसाडे यांनी व्हाईस रेकॉर्डर माझे बनियनचे डावे बाजुस सुरक्षीत बांधुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्र-1 श्री.सानप यांना शाखा अभियंता श्री.राख यांचे कालीका नगर, बीड येथील राहते घरी पाठवुन व्हॉईस रेकॉर्डरचे मदतीने पंचासमक्ष लाचमागणी पडताळणी केली असता, मी व पंच क्र.1 श्री.सानप असे शाखा अभियंता श्री.राख यांचे कालीका नगर,बीड येथील राहते घरी गेलो. त्याठिकाणी माझी व शाखा अभियंता श्री. राख यांची त्याचे राहते घरी भेट होवुन माझ्या काम बद्दल चर्चा झाली. चर्चे दरम्यान शाखा अभियंता श्री.राख यांनी माझ्या लॅपटॉप वरुन माझे कामाचे कागदपत्रे अपलोड करुन सबमीट केली. त्यानंतर श्री.राख यांनी मला " मग काय ते केली का कारवाई त्याची.. तु म्हणला ना घेऊन येतो म्हणुन.. पैसे.. अरे बाबा तुला त्या गिरीला काय द्यायचे ते दी..मी काही तुला जास्त मागत नाही मला दोन हजार दी.. गिरीला तीन हजार दे " असे स्वत: करीता 2000/- रुपये व गिरी साहेब यांचेकरीता 3,000/- रुपयेची मागणी करुन स्वत: करीता लागलीच 2000/- रुपये

स्विकारण्याचे मान्य केले. तसा दिनांक 03/03/2025 रोजी लाचमागणी पडताळणी स्थगिती पंचनामा करण्यात आलेला आहे.

त्यानंतर दिनांक 04/03/2025 रोजी मला व पंच क्र.1 श्री.सानप यांना श्री.गिरी साहेब व श्री.राख यांची भेट घेण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, कार्यालय नगर रोड बीड येथे पाठवुन व्हाईस रेकॉर्डरच्या मदतीने लाचमागणी पडताळणी केली असता, तेथे माझी, राख व गिरी साहेब यांची भेट झाली नाही. तसा दिनांक 04/03/2025 रोजी लाचमागणी पडताळणी स्थगिती पंचनामा करण्यात आलेला आहे. त्यानंतर मी श्री.गिरी यांना फोन लावला असता त्यांनी ते शिरुर येथे गेले असल्याचे सांगुन, दिनांक 05/03/2025 रोजी सकाळी सार्वजनिक बांधकाम विभाग, कार्यालय बीड येथे बोलविले.

त्यावर आज दिनांक 05/03/2025 रोजी श्री.गिरी साहेब हे माझे कामासंदर्भाने माझ्याकडे लाचेची मागणी करतात किंवा कसे ? या बाबत मला व पंच क्र.-1 श्री.सानप यांना श्री.गिरी साहेब यांची भेट घेण्याकीरता सार्वजनिक बांधकाम विभाग, नगर रोड, बीड येथे पाठवुन समक्ष लाचमागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पोनि/बगाटे यांनी मला व पंचांना लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने सुचना दिल्या. पोनि/बगाटे यांचे सुचनेवरुन पोलीस अंमलदार श्री.खरसाडे यांनी व्हाईस रेकॉर्डर माझे बनियनचे डावे बाजुस सुरक्षीत बांधुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्र-1 श्री.सानप यांना श्री.गिरी यांची भेट घेण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, नगर रोड, बीड येथे पाठवुन व्हॉईस रेकॉर्डरचे मदतीने पंचासमक्ष लाचमागणी पडताळणी केली असता, मी व पंच क्र.1 श्री. सानप असे श्री.गिरी यांची भेट घेण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, नगर रोड बीड येथे गेलो. तेथे माझी व श्री.गिरी साहेब यांची भेट झाली. त्यावेळी त्यांनी माझे कामा संदर्भाने ऑनलाईन कागदपत्राची पडताळणी करुन शाखा अभियंता श्री.राख यांना फोन लावुन रजिस्ट्री ऑफीसचे मुल्यांकन प्रमाणपत्र बाबत विचारणा केली. त्यावेळी श्री.राख यांनी सदरचे प्रमाणपत्र माझ्याकडे असल्याचे सांगुन माझ्याकडुन प्रमाणपत्र घेण्यास सांगितले. त्यावेळी सदरचे मुल्यांकन प्रमाणपत्र मी श्री.गिरी यांचे मोबाईलवर पाठवुन दिले. त्यानंतर श्री.पानसंबळ, कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग बीड-2 यांची भेट घेतली असता त्यांनी मला व श्री.गिरी यांना वनपरिक्षेत्र अधिकारी, पाटोदा यांचेकडुन पूनर्रमुल्यांकन मिळणे बाबतचे पत्र घेण्याबाबत कळविल्याने मी वनपरिक्षेत्र अधिकारी, पाटोदा यांचे पूनर्रमुल्यांकन करणे बाबत पत्र घेवुन श्री.गिरी यांना दिले. त्यावेळी मला श्री.गिरी यांनी एक महिण्याचे किती भाडे भेटते या बाबत विचारण केली असता मी, त्यांना पहिले 12,000/- होते आता 9,000/ रुपये भेटेल म्हणुन सांगितले. त्यावेळी लोकसेवक श्री.गिरी हे मला म्हणाले की, मी साहेबांची सही घेतो, त्यासाठीतुम्ही साहेबांना एक महिण्याच्या भाड्याचे पैसे द्या. त्यावर मी त्यांना आगोदर पण पैसे दिलेत. त्यावेळी श्री.गिरे हे मला म्हणाले की, तुम्हाला एक महिण्याचे भाडे द्यावे लागतेल. असे म्हणुन मला मिळणाऱ्या एक महिण्याचे भाडे श्री.गिरी यांनी श्री.पानसंबळ, कार्यकारी अभियंता, सा.बां.वि., बीड यांचे करीता मागणी केली.

त्यावरुन दि.05/03/2025 रोजी पोनि/बगाटे यांनी मला व दोन्ही पंचांना श्री.गिरी यांचेविरुध्द लाचेच्या सापळयाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगुन वेळे अभावी यशस्वी सापळा कारवाई नंतर एकत्रीत पंचनामा करण्यात येणार असल्याचे सांगुन श्री.गिरी यांचेकरीता 9000/- रुपये व कार्यालयात श्री.राख यांचे भेट झाली तर त्यांचेसाठी 2000/- रुपये असे एकुण 11,000/- रुपये लाच रक्कम देण्यासाठी पाठवुन सापळा कारवाई करण्यात येणार असल्याचे कळविले. पोनि/बगाटे यांनी सापळा कारवाईसाठी अॅंथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचा उपयोग होणार असल्याचे कळवुन त्याबाबत मला व पंचाना माहिती देऊन प्रात्यक्षिक करुन दाखवले तसेच मी हजर केलेली लाच रक्कम 11,000/-रुपये ज्यामध्ये 500/-रुपये दराच्या 22 नोटांचे क्रमांक स्वतंत्र कागदावर पंच क्र.2 श्री. गर्जे मदतीने नोंदवुण नोटांना अॅंथ्रासीन पावडर लावुन मला, सापळा पथक व पंचांना सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. श्री.गिरी व श्री.राख यांनी यांनी लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर पोनि/बगाटे यांना फोन करुन " हॅलो आई झालयं " असे बोलण्याचा ईशारा नेमुन दिला.

सापळा पुर्व कारवाई झाल्यानंतर पोनि/बगाटे यांचे सुचनेवरुन पोशि/खरसाडे यांनी व्हाईस रेकॉर्डर माझे बनियनचे डावे बाजुस छातीलगत सुरक्षीत बांधुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन मला व पंच क्र.-1 श्री.सानप यांना लाचमागणी पडताळणी दरम्यान ठरल्याप्रमाणे 11,000/-रु. लाच रक्कम श्री.गिरी व श्री.राख यांना देण्यासाठी कार्यकारी अभियंता, सा.बां.वि.क्र.2 बीड येथे पाठवुन लाचेच्या सापळा कारवाईचे आयोजन केले असता, मी व पंच क्र.01 श्री.सानप असे माझे कडील चार चाकी वाहनाने कार्यकारी अभियंता, सा.बां.वि.क्र.2 बीड येथे गेलो. तेथे श्री.राख हे आहेत का ? याची पाहणी केली त्यावेळी श्री.राख मला कार्यालयात दिसुन आले नाही. त्यावर मी श्री.गिरी यांची भेट त्यांच्या कक्षात घेतली. त्यावेळी आमचेमध्ये आझ्या कामा विषयी चर्चा सुरु झाली. चर्चे दरम्यान मी "नऊ हजार आणलेत मी" असे म्हणलो असता, श्री.गिरी यांनी मला "तो शिपाई हाई त्यांच्याकडे देऊन टाका, शिपाई हाई रफिक" म्हणुन 9,000/- रुपये शिपाई रफीक यांचेकडे गेलो. तेथे जावुन मी त्यांना माझे काम झालं का असे

विचारणा करुन "राख साहेबांना दोन द्यायचे राहिलेत" असे म्हणालो. त्यावेळी शिपाई रफीक मला "राखचे राहुंदी, साहेबाला मी देतो, त्यांचे ते देतीन घेतील" असे म्हणुन पैशाची मागणी केल्याने मी माझ्या पँटचे समोरील उजवे बाजुचे खिशातील लाच रक्कम 11,000/-रु. बाहेर काढुन त्यापैकी 500/- रुपये दराच्या चार नोटा बाजुला काढुन घेवुन उर्वरीत 9,000/- रुपये शिपाई श्री.रफिक यांना दिले असता, शिपाई रफीक यांनी लाच रककम 9,000/-रु. उजवे हाताने स्विकारुन दोन्ही हातानी मोजुन पँन्टच्या पाठीमागील सिटवर डावे बाजुचे खिशात डावे हाताने ठेवली. त्यावेळी मी मला लाच स्विकृतीनंतर करावयाचा नेमुन दिलेला पुर्वनियोजीत इशारा 16.06 वा.केला.
इशारा प्राप्त होताच पोनि/बगाटे, सापळा पथकातील सर्व सदस्य व पंच क्र.2 गर्जे असे आमचेजवळ आले. पोलीस अंमलदार श्री.खरसाडे यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतले. पोनि/बगाटे यांनी श्री.रफीक यांना त्यांची स्वत:ची, दोन्ही पंचांची व सापळा पथकातील सदस्यांची ओळख करुन दिली. पोनि/बगाटे यांनी पंच क्र. 1 श्री.सानप यांना पंच क्र.2 श्री.गर्जे यांचे समक्ष विचारणा केली की, माझे कडुन कोणी लाच रक्कम स्वीकारली. तेव्हा पंच क्र.1 श्री.सानप यांनी सांगितले की, माझ्याकडुन श्री.गिरी यांचे सांगणे वरुन शिपाई रफिक यांनी लाचरक्कम 9000/-रु. उजवे हाताने स्विकारुन दोन्ही हातानी मोजुन पँन्टच्या पाठीमागील सिटवर डावे बाजुचे खिशात डावे हाताने ठेवली असल्याचे सांगीतले." असा खुलासा पंच क्रमांक 1 श्री.सानप यांनी केला.
पोनि/बगाटे यांनी श्री.रफिक यांना त्यांचे नाव गाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव शेख रफिक इस्माईल वय-48 वर्ष, व्यवसाय नोकरी, शिपाई, कार्यकारी अभियंता कार्यालय, सां.बा.विभाग,बीड रा. इस्माईलबाग,अंबाजोगाई रोड केज ता.केज जि.बीड वर्ग-4 असे सांगीतले. पोनि/बगाटे यांनी शेख रफिक यांना लाच रकमे बाबत विचारणा केली असता, त्यांनी लाच रक्कम त्यांचे पँन्टच्या पाठीमागील सिटवर डावे बाजुचे खिशात असल्याचे सांगीतले. त्यावर पोनि/बगाटे यांनी सदरची लाच रक्कम पंच क्र. 2 श्री.गर्जे यांचे ताब्यात देऊन खात्री करण्यास सांगीतले. पंच क्र.1 सानप यांनी सापळापुर्व कारवाई दरम्यान नमुद केलेल्या नोटांचे क्रमांक वाचुन दाखवले. त्यावर पंच क्र.2 श्री.गर्जे यांनी लाचेच्या नोटांची खात्री करुन सापळापुर्व पंचनाम्यातील नोटांशी तंतोतंत मिळुन आल्याचे कळवले. पोनि/बगाटे यांनी सदरच्या नोटा पंच क्र.2 श्री.गर्जे यांना ताब्यात ठेवण्यास सांगीतले. त्यानंतर पोनि/बगाटे यांनी श्री.शेख रफिक यांना श्री.गिरी यांचे बाबत विचारणा करुन शोध घेतला असता ते तेथुन सापळा पथकाची हालचाल पाहुन निघुन गेले असल्याचे सांगितले. त्यावेळी कार्यकारी अभियंता, श्री.पानसंबळ यांना झाले कारवाई बाबत माहिती देवुन श्री.गिरी व श्री.राख यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव 1) अर्जुन आश्रुबा राख, वय 55 वर्षे, व्यवसाय नोकरी, शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र.2 रा.थेरला ता.पाटोदा जि.बीड वर्ग-2 व 2) श्री.रोहित बाबासाहेब गिरी, वय 24 वर्ष, व्यवसाय नौकरी, कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र.2 रा.माळापुरी ता.जि.बीड वर्ग-2 असे असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोनि/बगाटे, पंच व सापळा पथकातील सर्व सदस्य शासकीय वाहनाने व मी माझेकडील खाजगी वाहनाने ला.प्र.वि. कार्यालय, बीड येथे हजर आलो.
तरी श्री.अर्जुन आश्रुबा राख, वय 55 वर्षे, व्यवसाय नौकरी, शाखा अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र.2 यांनी माझ्याकडे माझे आईचे नावावरील मौजे पाटोदा येथील असलेले राहते घराचे ग्राऊंड फ्लोअर, वन परिक्षेत्र अधिकारी, पाटोदा यांना भाडेत्त्वावर दिल्यावर सदर जागा भाडे पूनर्मुल्यांकन प्रमाणपत्राचा ऑनलाईन अहवाल दाखल करण्यासाठी दिनांक 03/03/2025 रोजी 19.48 ते 20.14 वा.चे दरम्यान स्वत:साठी 2,000/- रुपये व श्री.गिरी यांचेकरीता 3000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम लागलीच स्विकारण्याचे मान्य केले. तसेच दिनांक 05/03/2025 रोजी 10.26 ते 14.20 वा.चे दरम्यान सदर भाडे मुल्यांकन प्रमाणपत्र देण्यासाठी श्री. रोहित बाबासाहेब गिरी, वय 24 वर्ष, व्यवसाय नौकरी, कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्र.2 यांनी लोकसेवक श्री.पानसंबळ यांचे करीता मला मिळणाऱ्या एक महिण्याचे भाड्याची रक्कम 9,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम शिपाई श्री.शेख रफिक यांचेकडे देण्यास सांगितली असता श्री. शेख रफिक इस्माईल वय-48 वर्ष, व्यवसाय नोकरी, शिपाई, कार्यकारी अभियंता कार्यालय, सां.बा.विभाग,बीड क्र.02 यांनी पंचासमक्ष लाच रक्कम 9,000/- रुपये कार्यकारी अभियंता, सा.बां.वि.बीड क्र.2 चे कार्यालयात स्विकारली असता लाच रक्कमेसह 16.06 वा.रंगेहात पकडण्यात आले. तसेच श्री.राख यांना देण्यासाठीची लाच रक्कम 2,000/- पोनि/श्री.बगाटे यांनी ताब्यात घेतली.
म्हणुन माझी 1) श्री.अर्जुन आश्रुबा राख, शाखा अभियंता, 2) श्री.रोहित बाबासाहेब गिरी, कनिष्ठ अभियंता व 3) श्री.शेख रफिक इस्माईल,शिपाई,कार्यकारी अभियंता कार्यालय,सा.बां.वि.बीड क्र.2 यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.
माझी वरील फिर्याद माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन, वाचुन पाहिली ती बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Maruti Bhimsen Khedkar(I (Inspector)) / 1460100450MBKM7901G

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

ठाणे अमलदार
पो. स्टे. शिवाजीनगर, बीड

**Name** (नाव): Maruti Bhimsen Khe

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): 1460100450MBKM7901